|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## प्रवेश व पात्रता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/६/प्र.पा/ १०१ /२०२५ दि. २५.०९.२०२५

**प्रति,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व कला, वाणिज्य व विज्ञान पदवी अभ्यासक्रम (NEP)
महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना.

**विषय :-** द्वितीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना स्पेशल विषय घेण्यासाठी येत असलेल्या अडचणींबाबत.

**महोदय / महोदया,**

आपणांस विदीतच आहे की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० नुसार प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गांना अभ्यासक्रम लागू करण्यात आले आहेत.

आता द्वितीय वर्षात प्रवेश घेतल्यानंतर काही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पेशल विषय घेण्यासाठी अडचणी येत असल्याचे महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी विद्यापीठाच्या निर्देशनास आणून दिले आहे.

त्या अनुषंगाने संबंधीत महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले पत्र हे दि. ०३ सप्टेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मा.अधिष्ठाता मंडळाच्या सभेत ठेवण्यात आले असता, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० दि. १३ मार्च, २०२४ च्या मार्गदर्शक तत्वानुसार द्वितीय वर्षासाठी Major व Minor विषय घेतांना ते विषय पहिल्या वर्षी M-1, M-2, M-3 पैकी एक असणे बंधनकारक असल्याने स्पेशल विषय घेतांना Major व Minor म्हणून घेतलेल्या विषयामध्ये पदवी संपादन करावयाची असल्याने महाविद्यालयांकडून आलेले प्रस्ताव अमान्य करण्यात यावे.

वरील बाब लक्षात घेऊन भविष्यात आपल्याकडे वरील प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यास विद्यापीठाकडे अग्रेषित करु नये, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

२५.९.२५

(राजेश म. बागुल)
**सहा. कुलसचिव**
(अति.कार्यभार)
प्रवेश, पात्रता व अभ्यास मंडळ विभाग

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle) जळगाव-४२५००१

**प्रत माहितीस्तव :-**
१) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
२) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
३) मा.अधिष्ठाता, सर्व संबंधीत विद्याशाखा, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
४) समन्वयक, ई-सुविधा कक्ष, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.